# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**निवडणूक तात्काळ**

क्रमांक - रानिआ/जिपपंस/२०१२/प्र.क्र.८/का.७,
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबईः- ४०० ०३२.
दिनांक - २१/०१/२०१२

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी, (मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा वगळून)

विषय :- जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका-२०१२
इच्छूक उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबत शौचालय असल्याबाबतचे प्रमाणपत्र ग्रामसभेच्या ठरावासहित जोडण्याबाबत निवडणूक नियमात तरतूद नसल्याबाबत.

संदर्भ :- ग्राम विकास व जलसंधारण विभागाची क्र. पंराज/२०११/प्र.क्र.९८/पंरा-२, दि. १३/१/२०१२ व २०/१/२०१२ ची पत्र. (प्रती सोबत जोडल्या आहेत.)

महोदय / महोदया,

ग्राम विकास व जलसंधारण विभागाने सर्व विभागीय आयुक्त व सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना पाठविलेल्या संदर्भांकित दि. १३ जानेवारी, २०१२ च्या पत्रामध्ये असे नमूद करण्यात आले होते की, राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील २७ जिल्हा परिषदा व ३०९ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम दि. ३/१/२०१२ रोजी जाहीर केलेला आहे. या निवडणुकांसाठी संबंधित उमेदवाराने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या कलम १६ मधील पोटकलम (१) मधील सुधारीत तरतुदीनुसार त्यांच्या नामनिर्देशनपत्रासमवेत शौचालय वापराबाबतचे ग्रामसभेच्या ठरावासह संबंधित पंचायतीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

तथापि, आता ग्राम विकास व जलसंधारण विभागाने संदर्भांकित दि. २०/१/२०१२ च्या पत्रान्वये उपरोक्त परिच्छेदात नमूद करण्यात आलेले दि. १३/१/२०१२ चे पत्र रद्द केले असून पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण देण्यात आले आहे :-

महाराष्ट्र जिल्हा परिषद कायद्याचे कलम १६ (१) जिल्हा परिषद कौन्सिलर, म्हणून निवडून येण्यास अथवा कौन्सिलर म्हणून राहण्यासाठी ज्या अनेक अनर्हता (Disqualifications) आहेत त्याबाबत आहे.

कौन्सिलर म्हणून कार्यरत असणाऱ्या व्यक्तीला सदर कलम १६ (१) (०) च्या पहिल्या परंतुकेनुसार त्यांचेकडे शौचालय असल्याबाबतचे संबंधित ग्रामपंचायतीचे ग्रामसभेच्या ठरावासहित प्रमाणपत्र मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना सादर करावयाचे आहे. हीच तरतूद विद्यमान पंचायत समितीच्या सदस्यांनाही लागू आहे.

मात्र **इच्छूक उमेदवाराने ग्रामसभेच्या ठरावासहीत ग्रामपंचायतीचे प्रमाणपत्र नामनिर्देशनपत्रासोबत जोडण्याची तरतूद महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती कायद्यांतर्गत केलेल्या निवडणूक नियमात नाही.**

वरील परिस्थितीत राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद / पंचायत समिती निवडणुकांकरिता तयार केलेला **"निवडणूक निर्णय अधिकारी यांचेसाठी सर्वसाधारण सूचना व माहिती पुस्तिका - जानेवारी, २०१२" मधील प्रकरण क्रमांक-२ (नामनिर्देशनपत्राबाबतच्या तरतुदी-सर्वसाधारण सूचना) मधील परिच्छेद-६ मधील सूचना व पृ.क्र. २६८ वरील शौचालयाच्या वापराबाबतच्या प्रमाणपत्राचा नमुना रद्द करण्यात आला आहे** असे समजण्यात यावे. तसेच याबाबतची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी यांना तात्काळ कळविण्यात यावी.

आपला,

सोबत वरीलप्रमाणे

( ध. मा. कानेड )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

D:\New Gen. referance .doc/D.O.7

# महाराष्ट्र शासन

पत्र क्र. पंराज २०११/प्र.क्र.९८/पंरा २
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- २० जानेवारी, २०१२

प्रति

विभागीय आयुक्त (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व)

**विषय :-जिल्हा परिषद व पंचायत समिती व ग्रामपंचायतीच्या सदस्याकडे शौचालय सुविधा असण्याबाबत.**

**संदर्भ** :- शा. प. क्र. पंराज २०११/प्र.क्र.९८/पंरा २, दि. १३/१/२०१२

वरील संदर्भीय **पत्र दि. १३.१.२०१२ रद्द** करण्यात येत आहे व खालीलप्रमाणे स्पष्टीकरण देण्यात येत आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद कायद्याचे **कलम १६ (१)** जिल्हा परिषद कौन्सिलर, म्हणून **निवडून येण्यास** अथवा **कौन्सिलर म्हणून राहण्यासाठी** ज्या अनेक **अनर्हता (Disqualifications)** आहेत त्याबाबत आहे.

**कौन्सिलर म्हणून कार्यरत असणाऱ्या व्यक्तीला** सदर कलम 16 (1) (o) च्या पहिल्या परंतुकेनुसार त्यांचेकडे शौचालय असल्याबाबतचे संबंधित ग्रामपंचायतीचे ग्रामसभेच्या ठरावासहित प्रमाणपत्र मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना सादर करावयाचे आहे. हीच तरतूद **विद्यमान** पंचायत समितीच्या सदस्यांनाही लागू आहे.

मात्र **इच्छुक उमेदवाराने ग्रामसभेच्या ठरावासहित ग्रामपंचायतीचे प्रमाणपत्र नामनिर्देशनपत्रासोबत जोडण्याची तरतूद महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती कायद्यांतर्गत केलेल्या निवडणूक नियमात नाही.**

निवडणूक प्राधिकरण इच्छुक उमेदवाराकडून कलम १६ (१) मधील इतर अनर्हतेबाबत ज्याप्रमाणे शहानिशा प्रक्रिया विहीत करु शकते त्याप्रमाणे याही अनर्हतेबाबत न्यायोचित निदेश देण्यास सक्षम आहे.

**(सुधीर ठाकरे)**
**सचिव (ग्रा. वि. व पं. रा.)**

**प्रत माहितीस्तव :-**

१. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
त्यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त सूचनांना प्रसिध्दी माध्यमांद्वारे व्यापक प्रसिध्दी देण्यासाठी तातडीने आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

२. उपायुक्त, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालयासमोर, मुंबई - ४०००३२.

महाराष्ट्र शासन

**तात्काळ**

क्र.पंराज-२०११/प्र.क्र.९३/पंरा-२
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १३ जानेवारी, २०१२

प्रति,

**विभागीय आयुक्त, (सर्व)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
जिल्हा परिषद (सर्व)

विषय: जिल्हा परिषद व पंचायत समिती व ग्रामपंचायतींच्या सदस्याकडे शौचालय सुविधा असण्याबाबत.

संदर्भ: १) सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३३,
२) शासन पत्र क्र.संकीर्ण-२०१०/प्र.क्र.१२२/पंरा-२, दिनांक १५ मार्च, २०११
३) सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३९

महोदय,

राज्यातील ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या सदस्यांकडे शौचालयाची सुविधा असावी व त्यांच्याकडून नियमितपणे शौचालयाचा वापर व्हावा या संबंधीच्या प्रयत्नाचा भाग म्हणून जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ व मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मध्ये सुधारणा करण्यात आली असून संदर्भाधीन क्र.१ व ३ येथे नमुद केलेल्या अधिनियमाद्वारे याबाबतच्या अनुषंगीक तरतूदी कायद्यात केलेल्या आहेत. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील कलम १४ मधील पोटकलम (१) आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या कलम १६ मधील पोटकलम (१) मधील सुधारीत तरतूदीनुसार जी व्यक्ती ,---
(एक) तिच्या मालकीच्या घरात राहत असून, त्या घरामध्ये शौचालय आहे व ती अशा शौचालायाचा नियमितपणे वापर करीत आहे; किंवा
(दोन) तिच्या मालकीच्या घरात राहत नाही, आणि त्या घरामध्ये शौचालय आहे व ती अशा शौचालयाचा नियमितपणे वापर करीत आहे किंवा तिच्या अशा घरामध्ये शौचालय नाही मात्र ती सार्वजनिक शौचालयाचा नियमितपणे वापर करीत आहे,

असे प्रमाणित करणाऱ्या ग्रामसभेच्या ठरावासोबत संबंधित पंचायतीचे प्रमाणपत्र सादर करण्यास कसूर करील, अशी व्यक्ती निरर्ह ठरेल.

वरील अधिनियमाच्या अमंलबजावणीसाठी प्रथमत: दि.३० जानेवारी, २०११ हा दिनांक निश्चित करण्यात आलेला होता. तथापि, त्यास संदर्भ क्र.३ येथील अधिनियमाने केलेल्या सुधारणेनुसार एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली होती. ही मुदत आता संपलेली असल्याने आता ग्रामपंचायत सदस्याने मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ कलम १४ मधील पोटकलम (१) खंड (ज-५) व जिल्हा परिषद /पंचायत समिती सदस्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ कलम १६ मधील पोटकलम (१) मध्ये खंड (त) नुसार स्वत: च्या मालकीच्या किंवा मालकीच्या नसलेल्या परंतू शौचालयाची सुविधा असलेल्या घरात वास्तव्य करीत असल्यास अशा घरातील शौचालयाचा किंवा शौचालय सुविधा नसल्यास सार्वजनिक शौचालयाचा नियमितपणे वापर करीत असल्याबाबतचे ग्रामसभेच्या ठरावासह संबंधित पंचायतीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे अन्यथा कायद्यातील उपरोल्लेखित तरतूदीनुसार संबंधित सदस्य अपात्र ठरतील

Emailed
on 17/1/12

राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील २७ जिल्हा परिषदा व ३०९ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूकांचा कार्यक्रम दिनांक ३ जानेवारी, २०१२ रोजी जाहीर केलेला आहे. या कार्यक्रमानुसार संबंधित उमेदवारांनी दिनांक १८ जानेवारी, २०१२ ते २३ जानेवारी, २०१२ या कालावधीत नामनिर्देशनपत्र दाखल करावयाची आहेत. या निवडणूकांसाठी संबंधित उमेदवारांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या कलम १६ मधील पोटकलम (१) मधील सुधारीत तरतूदीनुसार त्यांच्या नामनिर्देशनपत्रासमवेत शौचालय वापराबाबतचे ग्रामसभेच्या ठरावासह संबंधित पंचायतीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. सबब, संबंधित उमेदवारांना त्यांच्या विनंतीनुसार ग्रामसभेच्या ठरावासह पंचायतीचे प्रमाणपत्र उपलब्ध होण्याच्या दृष्टीने ज्या जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणूका जाहीर झालेल्या आहेत त्या जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये **गुरुवार दिनांक १९ जानेवारी, २०१२** रोजी विशेष ग्रामसभेचे आयोजन करुन संबंधित उमेदवारांच्या विनंतीनुसार त्यांना आवश्यक ती प्रमाणपत्रे उपलब्ध करुन देण्यात यावीत, जेणेकरुन या संबंधीच्या प्रमाणपत्राअभावी इच्छूक उमेदवारांना नामनिर्देशनपत्र दाखल करण्यास अडचणी येणार नाहीत. **त्यानुसार सर्व संबंधितांना तातडीने सूचना द्याव्यात.** तसेच याबाबत इच्छूक उमेदवारांनाही कायद्यातील उपरोक्त तरतूदीची माहिती तसेच विशेष ग्रामसभेच्या आयोजनाबाबतची माहिती होण्यासाठी आपला विभाग/जिल्हा परिषदे अंतर्गत मोठया प्रमाणात प्रसिध्दी करुन ज्या ग्रामपंचायत/पंचायत समिती/जिल्हा परिषद सदस्याकडे सध्या शौचालयाची सुविधा नाही अशा सदस्यांना कायद्याने दिलेली मुदतवाढ संपलेली आहे तसेच आगामी सार्वत्रिक निवडणूकांसाठी नामनिर्देशनपत्रासोबत शौचालय वापराबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे याची जाणीव करुन देण्यासाठी व्यापक मोहीम राबविण्यात यावी. यासंबंधी अपात्रतेबाबतच्या मुद्यासंबंधी सर्व संबंधितांना विशेषत्वाने अवगत करण्यात यावे.

आपला,

(डॉ.मल्लीनाथ कलशेट्टी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीस्तव,

१) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
त्यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त सूचनांना प्रसिध्दी माध्यमांद्वारे व्यापक प्रसिध्दी देण्यासाठी तातडीने आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

२) उपायुक्त, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.